१२८

# MAHARASHTRA ACT No. XIX OF 1974.

## THE MAHARASHTRA TAX ON RESIDENTIAL PREMISES ACT, 1974

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक २४ एप्रिल १९७४ रोजी मिळाली असल्यामळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

बी. पी. दलाल,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XIX OF 1974.

## AN ACT TO PROVIDE FOR THE LEVY AND COLLECTION OF TAX ON CERTAIN RESIDENTIAL PREMISES IN THE STATE OF MAHARASHTRA

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २९ एप्रिल १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला. ]

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

**महाराष्ट्र राज्यातील विवक्षित निवासी जागांवर कर बसविण्याची आणि तो वसूल करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील विवक्षित निवासी जागांवर कर बसविण्याची आणि तो वसूल करण्याची तरतूद करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रारंभिक

१. या अधिनियमास, महाराष्ट्र निवासी जागांवरील कर अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव.

२. संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,— व्याख्या.

(अ) "अपील प्राधिकारी" म्हणजे, कलम १० अन्वये नेमण्यात आलेला अपील प्राधिकारी;

(ब) कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात "नियत दिवस" म्हणजे, हा अधिनियम त्या क्षेत्रात ज्या तारखेस अंमलात येईल ती तारीख;

(क) "करपात्र व्यक्ती" म्हणजे, या अधिनियमान्वये कर किंवा इतर कोणतीही रक्कम ज्या व्यक्तीकडून देय असेल ती व्यक्ती आणि तीत, ज्या व्यक्तीच्या संबंधात, तिच्याकडून देय असलेल्या कराच्या आकारणीसाठी, या अधिनियमान्वये कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल अशा प्रत्येक व्यक्तीचा समावेश होईल;

(ड) "आकारणी प्राधिकारी" म्हणजे, कलम ६ अन्वये नेमण्यात आलेला अधिकारी ;

(ई) "इमारत" या संज्ञेत, घर, उपगृह, छपरी, झोपडी किंवा अशी कोणतीही इतर संरचना—मग ती चिरेबंदी, विटा, लाकूड, चिखल, धातू किंवा इतर कोणत्याही सामग्रीने बांधलेली असो—यांचा समावेश होतो, परंतु त्यात, मोटारघराचा किंवा नोकरांच्या वापरासाठी असलेल्या आणि त्यांच्याकडून तसा वापर करण्यात येत असलेल्या, निवासस्थानाचा समावेश होणार नाही ;

(फ) "वसुली प्राधिकारी" म्हणजे, कलम ११ अन्वये कर वसूल करण्याची शक्ती प्रदान करण्यात आलेला प्राधिकारी ;

(ग) "जिल्हाधिकारी" या संज्ञेमध्ये, या अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि त्याची कामे पार पाडण्यासाठी राज्य शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होईल ;

(ह) "महानगरपालिका क्षेत्र" म्हणजे, संबद्ध नगरपालिका विधिअन्वये रचना करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या हद्दींमधील क्षेत्र आणि त्यामध्ये, छावणी अधिनियम, १९२४, अन्वये व्याख्या केल्याप्रमाणे पुणे, खडकी आणि कामटी छावणीच्या हद्दींतील क्षेत्रांचा समावेश होईल ;

(आय) "तळ जमिनीचे क्षेत्र" म्हणजे, भिंतींची जाडी वगळून, एखाद्या जागेच्या एकूण तळ जमिनीचे क्षेत्र ;

(जे) "महानगरपालिका" म्हणजे, संबद्ध नगरपालिका विधिअन्वये रचना करण्यात आलेली किंवा प्रस्थापित करण्यात आलेली महानगरपालिका आणि छावणी मंडळ ;

(के) "भोगवटादार" या संज्ञेमध्ये, पुढील व्यक्तींचा समावेश होईल :—

(एक) ज्या निवासी जागेच्या संबंधात भाडे देण्यात येत असेल किंवा देय असेल त्या निवासी जागेचे भाडे किंवा भाड्याचा कोणताही भाग त्यावेळी जी कोणतीही व्यक्ती मालकाला देत असेल किंवा देण्यास पात्र असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

(दोन) आपल्या निवासी जागेत रहात असलेला किंवा अन्यथा आपल्या जागांचा वापर करीत असलेला मालक ;

(तीन) भाडेमाफ भाडेकरू ;

(चार) कोणतीही निवासी जागा ज्याच्या भोगवट्यात असेल असा अनुज्ञप्तिधारक, आणि

(पाच) कोणत्याही निवासी जागेचा वापर आणि भोगवटा केल्याने होणाऱ्या नुकसानीबद्दल मालकाला भरपाई देण्यास पात्र असेल अशी कोणतीही व्यक्ती ;

(ल) कोणत्याही निवासी जागेच्या संबंधात "मालक" म्हणजे, ज्या व्यक्तीला उक्त जागेचे भाडे मिळत असेल किंवा जागा भाड्याने देण्यात आली तर जिला तिचे भाडे मिळण्याचा हक्क असेल अशी व्यक्ती आणि त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होईल :—

(एक) मालकासाठी म्हणून ज्याला असे भाडे मिळत असेल असा अभिकर्ता किंवा विश्वस्त,

(दोन) सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने उक्त जागेच्या मालकाचा प्रभार घेण्यासाठी किंवा मालकाच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी नमलेला धारक, पृथक्कर्ता किंवा व्यवस्थापक ; आणि

(तीन) कब्जे गहाणदार.

(म) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले ;

१५१

(न) "संबद्ध नगरपालिका विधी" म्हणजे,—

(एक) बृहन्मुंबईच्या संबंधात, मुंबई महानगरपालिका अधिनियम,

(दोन) पुणे, सोलापूर आणि कोल्हापूर या शहरांच्या संबंधात, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९,

(तीन) नागपूर शहराच्या संबंधात, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८,

(चार) कोणत्याही छावणीच्या संबंधात, छावणी अधिनियम, १९२४,

(ओ) "निवासी जागा" म्हणजे, ज्या कोणत्याही इमारतीचा किंवा तिच्या भागाचा निवासाच्या प्रयोजनांसाठी वापर करण्यात येत असेल किंवा स्वतंत्र वापर करण्याचा उद्देश असेल अशी कोणतीही इमारत किंवा तिचा भाग;

(पी) "अनुसूची" म्हणजे, या अधिनियमाला जोडलेली अनुसूची;

(क्यू) "कर" म्हणजे, या अधिनियमान्वये बसविण्यात आलेला कर;

(आर) "करयोग्य जागा" म्हणजे, ज्या निवासी जागेच्या संबंधात या अधिनियमान्वये कर बसविण्याजोगा असेल अशी निवासी जागा;

(एस) "वर्ष" म्हणजे, वित्तीय वर्ष.

## कर बसविणे व कर निर्धारण

**विवक्षित निवासी जागांवर कर बसवणे व तो वसूल करणे.**

३. या अधिनियमाच्या उपबंधास अधीन राहून, अनुसूचीच्या स्तंभ एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महानगरपालिका क्षेत्रांमध्ये असलेल्या, निवासी जागांच्या तळजमीन क्षेत्राच्या आधारे, सर्व निवासी जागांवर, त्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये, अशा प्रत्येक क्षेत्रासमोर नमूद केलेल्या दरांनी १ एप्रिल १९७४ पासून सुरु होणाऱ्या प्रत्येक वर्षासाठी कर बसविण्यात आणि वसूल करण्यात येईल.

**करासंबंधीची प्राथमिक जबाबदारी.**

४. (१) कोणत्याही निवासी जागेचा प्रत्यक्ष भोगवटादार हा, तिचा मालक असेल तर, प्रत्यक्ष भोगवटादारावर प्रथमतः कर बसविण्यात येईल.

(२) इतर कोणत्याही बाबतीत—

(अ) जागा भाड्याने देण्यात आली असेल तर (भाडे पट्ट्याने देणारा) पट्टाकार,

(ब) जागा पोट-भाड्याने देण्यात आली असेल तर, वरिष्ठ पट्टाकार,

यावर प्रथमतः कर बसविण्याजोगा असेल.

**अधिनियमाखाली कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने, कर दिला असेल तर तिला जागेच्या भोगवटादाराकडून कराची रक्कम वसूल करण्याचा हक्क असणे.**

५. (१) कलम ४ च्या उपबंधांखाली जिच्यावर कर बसविण्याजोगा असेल अशा कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही जागेच्या संबंधात कर दिला असेल तर, तिने ज्या मुदतीसाठी कराचा भरणा केला असेल त्या मुदतीमध्ये तिने स्वतः त्या जागेचा भोगवटा केला नसेल तर तिला, पूर्वोक्त मुदतीसाठी अशा जागेचा प्रत्यक्ष भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून कराची रक्कम वसूल करण्याचा हक्क असेल.

(२) या कलमाखाली भोगवटादाराकडून केलेली कराच्या कोणत्याही रकमेची वसुली ही मुंबई भाडेनियंत्रण, पथिकाश्रम व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ याच्या कलम ७ च्या किंवा राज्यातील कोणत्याही भागात अंमलात असलेल्या तत्सम अशा कोणत्याही विधीच्या प्रयोजनासाठी, वाढ असल्याचे मानण्यात येणार नाही.

**आकारणी प्राधिकाऱ्याची नेमणूक.**

६. कराच्या आकारणीच्या प्रयोजनार्थ, महानगरपालिकेस, तिला योग्य वाटेल अशा तिच्या अधिकाऱ्यांची, लेखी आदेशाद्वारे, आकारणी प्राधिकारी म्हणून, नेमणूक करता येईल आणि त्यांची अधिकारिता निश्चित करता येईल.

**करयोग्य जागांची यादी तयार करणे व ती ठेवणे.**

७. (१) प्रत्येक आकारणी प्राधिकारी, त्याच्या नेमणुकीच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत किंवा कोणत्याही प्रकरणी किंवा प्रकरणांच्या वर्गाच्या संबंधात महानगरपालिका विनिर्दिष्ट करील अशा अधिक मुदतीच्या आत, सर्व करयोग्य जागांची यादी तयार करण्यास आणि ती, विहित करण्यात येईल अशा रीतीने प्रसिद्ध करण्यास फर्मावील. या प्रयोजनासाठी, महानगरपालिकेस कोणत्याही इमारतींचे किंवा जागांचे निरीक्षण करता येईल किंवा तिला योग्य वाटेल अशी चौकशी करता येईल.

(२) कोणत्याही जागेवर बांधकाम करण्यात, फेरफार करण्यात, तीत भर घालण्यात किंवा तिची संपूर्ण किंवा अंशतः पुनर्बांधणी करण्यात आल्यामुळे किंवा यादीत चुकीने नोंद वगळल्यामुळे, किंवा लबाडीने, अपघाताने किंवा चुकीने कोणतीही नोंद समाविष्ट झाल्यामुळे, उक्त यादीत भर घालणे, तीमधील नोंद वगळणे किंवा तीत फेरबदल करणे आवश्यक असल्याचे दिसून येईल तेव्हा, यादीत अशी कोणतीही नोंद समाविष्ट करून, ती वगळून किंवा तिच्यात फेरबदल करून, आकारणी प्राधिकाऱ्या-कडून करयोग्य जागांची यादी अद्यावत ठेवण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) खालील करयोग्य जागांची यादी तयार करणे व ती प्रसिद्ध करणे आकारणी प्राधिकाऱ्यास शक्य व्हावे यासाठी, प्रत्येक करयोग्य जागेचा मालक, नियत दिवसापासून दोन महिन्यांच्या आत, आकारणी प्राधिकाऱ्याला पुढील तपशील अंतर्भूत असलेले एक विवरण देईल :—

(एक) जेथे ती जागा असेल ती वस्ती आणि तेथील इमारत ;

(दोन) जागेचे तळजमीन क्षेत्र ;

(तीन) जागेच्या मालकाचे आणि त्याच्या भोगवटादाराचे, कोणताही असल्यास, नाव आणि त्यांचे कायम पत्ते,

(चार) निवासी जागेतील प्रत्यक्ष भोगवटादाराचे नाव, आणि

(पाच) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आकारणी प्राधिकाऱ्यास आवश्यक असेल असा इतर तपशील.

(४) पोट-कलम (२) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे करयोग्य जागांची अद्यावत यादी ठेवणे आकारणी प्राधिकाऱ्यास शक्य व्हावे या प्रयोजनासाठी, या अधिनियमाखाली करयोग्य असेल किंवा कोणत्याही वेळी करयोग्य असण्याचे बंद झाली असेल अशा जागेचा प्रत्येक मालक, अशी जागा या अधिनियमाखाली करयोग्य झाल्यानंतर किंवा यथास्थिती, करयोग्य असण्याचे बंद झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील अंतर्भूत असणारे एक विवरण, आकारणी प्राधिकाऱ्यास देईल.

**करयोग्य जागेची आकारणी.**

८. (१) कर आकारणीच्या प्रयोजनासाठी, करयोग्य जागांच्या यादीत अंतर्भूत असलेल्या तपशीलावर आधारित अशी आकारणी यादी ही, प्रत्येक इमारतीच्या संबंधात आकारणी प्राधिकाऱ्या-कडून वेगवेगळी तयार करण्यात येईल.

(२) नियत दिवसानंतर प्रथमतःच तयार करावयाची आकारणी यादी ही, सर्वसाधारणपणे नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या आत, तयार करण्यात येईल आणि त्यानंतरची अशी प्रत्येक यादी ज्या वर्षाशी ती संबंधित असेल त्या वर्षाच्या ३० जूनपूर्वी तयार करण्यात येईल.

(३) पोट-कलम (२) अन्वये आकारणी यादी तयार करण्यात आल्यानंतर, करयोग्य जागांच्या यादीतील कोणतीही नोंद वगळण्यात आली असेल, तीमध्ये फेरबदल करण्यात आला असेल किंवा तिच्यामध्ये भर घालण्यात आली असेल व अशी नोंद वगळल्यामुळे, तिच्यात फेरबदल केल्यामुळे किंवा भर घालण्यात आल्यामुळे, आकारणी यादीत कोणताही फेरबदल करणे आवश्यक असेल त्याबाबतीत, आकारणी प्राधिकारी, अशा फेरबदलांची यादी तयार करील.

**आकारणी यादी व फेरबदलांची यादी प्रसिद्ध करणे.**

९. (१) कलम ८ अन्वये आकारणी यादी किंवा फेरबदलांची यादी तयार करण्यात आल्या-बरोबर, आकारणी प्राधिकारी तत्संबंधीची व अशी यादी किंवा तिची प्रत जेथे पाहता येईल त्या जागेसंबंधीची नोटीस, विहित रीतीने प्रसिद्ध करण्याची व्यवस्था करील, व अशा यादीत समाविष्ट असलेल्या जागांचा एकतर मालक किंवा भोगवटादार असल्याचा दावा करणाऱ्या व्यक्तीस व अशा व्यक्तीच्या कोणत्याही अभिकर्त्यास, अशी यादी पाहण्याचे व कोणत्याही आकारणीशिवाय, तीमधील उतारे घेण्याचे स्वातंत्र्य असेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रसिद्ध करण्यात आलेल्या प्रत्येक नोटिशीत, आकारणी यादीच्या किंवा फेरबदलांच्या यादीच्या संबंधात ज्या तारखेपूर्वी हरकती सादर करता येतील अशी, नोटिशींच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून पंधरा दिवसांपेक्षा अगोदरची व तीस दिवसांनंतरची नसणारी तारीख विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(३) मालकास किंवा भोगवटादारास, नोटिशीत निश्चित केलेल्या मुदतीपूर्वी, आकारणी प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज सादर करून व आकारणी यादीसंबंधात किंवा फेरबदलांच्या यादीसंबंधात ज्या कारणावरून विवाद असेल ती कारणे नमूद करून, आकारणी यादीबाबत किंवा फेरबदलांच्या यादीबाबत हरकत घेता येईल. अशा रीतीने करण्यात येणारे सर्व अर्ज, त्या प्रयोजनार्थ आकारणी प्राधिकाऱ्याने ठेवलेल्या नोंदवहीत नोंदवण्यात येतील.

(४) पोट-कलम (२) खालील नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यानंतर, आकारणी प्राधिकारी, आक्षेप घेणाऱ्यास जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, हरकतीसंबंधात अन्वेषण करील व ते निकालात काढील, व पोट-कलम (३) अन्वये ठेवण्यात आलेल्या नोंदवहीत तत्संबंधीचा निर्णय नोंदविण्याची व्यवस्था करील, तसेच आकारणी यादीत किंवा यथास्थिती, फेरबदलांच्या यादीत अशा निर्णयानुसार करणे आवश्यक असलेली कोणतीही सुधारणा करण्याची व्यवस्था करील.

(५) पोट-कलम (४) अन्वये अंतिमतः केलेली आकारणी यादी किंवा, यथास्थिती, फेरबदलांची यादी, आकारणी प्राधिकाऱ्यांकडून, त्याच्या सहीनिशी व कार्यालयाच्या शिक्क्यानिशी अधिप्रमाणित करण्यात येईल, तसेच आकारणी प्राधिकारी त्यावर आकारणी यादीच्या किंवा, यथास्थिती फेरबदलांच्या यादीच्या संबंधात, तिच्यामधील ज्या बाबींच्या संबंधात सुधारणा करण्यात आल्या आहेत त्या बाबींशिवाय, कोणतीही वैध हरकत घेण्यात आलेली नाही असे प्रमाणपत्र पृष्ठांकित करील.

(६) पोट-कलम (५) मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अधिप्रमाणित केलेली यादी, आकारणी प्राधिकारी, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने, प्रसिद्ध करील, व अशा यादीनुसार कर वसूल करण्यासाठी त्याची एक प्रत, तो, वसुली प्राधिकाऱ्याकडे पाठवील.

१०. (१) आकारणी यादी किंवा फेरबदलांची यादी यासंबंधातील अपिलांची सुनावणी करण्याच्या प्रयोजनार्थ, महानगरपालिकेस, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तिला योग्य वाटतील इतक्या आपल्या अधिकाऱ्यांची, अपील प्राधिकारी म्हणून, नियुक्ती करता येईल व त्यांची अधिकारिता निश्चित करील. अपील.

(२) आकारणी प्राधिकाऱ्याने आकारणी केलेल्या कराच्या रकमेबाबत आक्षेप घेणाऱ्या किंवा अशा रीतीने आकारणी केलेला कर देण्याची आपली जबाबदारी नाकारणाऱ्या कोणत्याही करपात्र व्यक्तीस, अशा आकारणीविरुद्ध अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल :

परंतु, कर देण्यात आल्याशिवाय, असे कोणतेही अपील दाखल करून घेण्यात येणार नाही.

(३) असे अपील विहित नमुन्यात असेल व त्याची पडताळणी विहित रीतीने करण्यात येईल.

(४) आकारणी केलेला कर देण्याबाबतचे देयक सादर करण्यात आल्यानंतर पंधरा दिवसांमध्ये अपील सादर करण्यात येईल ; परंतु, उक्त मुदतीत अपील सादर न करण्याबाबत अपीलकाराकडे पुरेसे कारण होते याबद्दल अपील प्राधिकाऱ्याची खात्री होईल तर, अपील प्राधिकाऱ्यास, उक्त मुदत संपल्यानंतरही सादर केलेले अपील दाखल करून घेता येईल.

(५) अपील प्राधिकारी अपिलाची सुनावणी करण्यासाठी दिवस व जागा निश्चित करील व त्यास, वेळोवेळी, सुनावणी स्थगित करून त्यास योग्य वाटेल अशी पुढील चौकशी करता येईल किंवा करण्याची व्यवस्था करता येईल. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, आकारणी प्राधिकाऱ्यास आपली बाजू मांडण्याचाही अधिकार असेल.

(६) अपील निकालात काढताना, अपील प्राधिकाऱ्यास,—

(अ) आकारणी कायम करता येईल, ती कमी करता येईल, वाढविता येईल किंवा तिचे विलोपन करता येईल, किंवा ;

(ब) आकारणी रद्द ठरविता येईल व निदेश देण्यात येईल अशी आणखी चौकशी करण्यात आल्यानंतर, नवीन आकारणी करण्यासंबंधी आकारणी प्राधिकाऱ्यास निदेश देता येईल.

(७) अपिलाचा निर्णय झाल्यावर, अपील प्राधिकारी, त्याने संमत केलेले आदेश, अपीलकारास व आकारणी प्राधिकाऱ्यास कळवील.

(८) अपील प्राधिकाऱ्याने दिलेले आदेश, अंतिम असतील व त्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयांत हरकत घेण्यात येणार नाही.

(९) अपील प्राधिकाऱ्याने आकारणीची रक्कम वाढविली असेल त्या बाबतीत, आकारणी प्राधिकारी, अपीलकाराने द्यावयाची जादा रक्कम निर्दिष्ट करणारा आदेश काढील व उक्त रकमेच्या वसुलीसाठी, त्याची एक प्रत, वसुली प्राधिकाऱ्याकडे पाठवील.

## कर वसुली

कर, इत्यादी वसूल करण्यासाठी सक्षम प्राधिकारी.

११. (१) कर हा,—

(अ) (छावणी विभाग नसणाऱ्या) महानगरपालिका क्षेत्रात, महानगरपालिकेकडून, व

(ब) पुणे, खडकी व कामटी यां छावणी विभागांत, जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडून,

—वसूल करण्यात येईल.

(२) या अधिनियमाखालील कर (कोणतीही शास्ती धरून),—

(अ) (छावणी विभाग नसणाऱ्या) कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रात, संबद्ध नगरपालिका विधीअन्वये त्या क्षेत्रात ज्या पद्धतीने मालमत्ता कर वसूल करण्यात येतो त्याच पद्धतीने, व

(ब) पुणे, खडकी व कामटी या छावणी विभागांत, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे

—वसूल करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही महानगरपालिका क्षेत्रात, महानगरपालिकेने मालमत्ता कर बसविला नसेल तर, कराची वसुली, विहित करण्यात येईल अशा रीतीने, करण्यात येईल.

(३) कोणत्याही महानगरपालिकेच्या वतीने या अधिनियमाखालील कराची व शास्तीची वसुली ही, संबद्ध नगरपालिका विधीअन्वये अशा महानगरपालिकेच्या वतीने मालमत्ता कर वसूल करण्यासाठी नियुक्त केलेल्या, समुचित महानगरपालिका प्राधिकाऱ्याकडून करण्यात येईल.

(४) महानगरपालिकेस, कर वसुलीच्या खर्चाच्या बाबतीत, विहित करण्यात येईल असा वटाव मिळण्याचा हक्क असेल, व निरनिराळ्या महानगरपालिका क्षेत्रांसाठी, वटावाच्या निरनिराळ्या दरांची तरतूद करता येईल.

ज्यांच्या बाबतीत कर बसविण्याजोगा असेल अशा या इमारतींवर कर हा भार म्हणून असणे.

१२. कोणत्याही विधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आणि कोणत्याही करारातून किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणतेही अधिकार उद्भवत असले तरीही, कोणत्याही करयोग्य जागेच्या बाबतीत राज्य शासनास देय असलेला त्यावरील जमीन महसूल, कोणताही असल्यास, प्रथम देण्यात येईल या शर्तीस अधीन राहून, कर किंवा शास्ती म्हणून देय असलेल्या सर्व रकमा या—

(अ) शासनाकडून प्रत्यक्ष धारण करण्यात आलेल्या कोणत्याही जागांच्या संबंधात, अशा करासाठी किंवा शास्तीसाठी पात्र असलेल्या व्यक्तीच्या अशा जागेमधील हितसंबंधावर व अशा जागेमध्ये आढळून आलेल्या व अशा व्यक्तीच्या मालकीच्या मालावरील व इतर जंगम संपत्ती कोणतीही असल्यास, तीवरील, आणि

(ब) इतर कोणत्याही जागांच्या संबंधात, अशा जागांवरील व अशा जागांमध्ये आढळून आलेल्या व असा कर किंवा शास्ती देण्यासाठी पात्र असलेल्या व्यक्तीच्या मालकीच्या मालावरील व इतर जंगम संपत्ती, कोणतीही असल्यास, तीवरील

—भार असतील.

१३. प्रत्येक वर्ष संपल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, वसुली प्राधिकारी, त्या वर्षाच्या बाबतीत आकारणी प्राधिकाऱ्याने आकारलेली कराची एकूण रक्कम व वसुली प्राधिकाऱ्याने वसूल केलेली अशा आकारित कराची एकूण रक्कम दर्शविणारे विवरण, राज्य शासनाकडे सादर करील. वसुली प्राधिकाऱ्याने कर वसुलीचे विवरण सादर करणे.

१४. (१) कोणतीही महानगरपालिका, या अधिनियमाखालील कराच्या बाबतीत देय असलेल्या कोणत्याही रकमेची वसुली करण्यात किंवा ती राज्य शासनास देण्यात कसूर करील तर, राज्य शासनास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा रकमेच्या वसुलीसाठी किंवा ती देण्यासाठी, मुदत निश्चित करता येईल. कर वसूल करण्यात महानगरपालिकेने केलेली कसुरी.

(२) अशा रीतीने निश्चित केलेल्या मुदतीत, रकमेची वसुली करण्यात किंवा ती देण्यात आली नाही तर, राज्य शासनास, अशा महानगरपालिकेकडे निहित असलेल्या निधीसंबंधातील कोणत्याही विधीमध्ये किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही विधीमध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या बँकेमध्ये महानगरपालिकेचा कोणताही पैसा ठेव म्हणून ठेवण्यात आला असेल अशा कोणत्याही बँकेस किंवा अशा महानगरपालिकेचा कोणताही पैसा ठेव म्हणून ठेवण्यात येत असेल अशा शासकीय कोषागाराच्या किंवा कोणत्याही इतर सुरक्षा स्थानाच्या प्रभारी व्यक्तीस, अशा बँकेत किंवा यथास्थिती अशा व्यक्तीच्या हाती असलेल्या महानगरपालिकेच्या खात्यातील जमा पैशामधून किंवा अशा बँकेस किंवा व्यक्तीस, ठेवीच्या रूपाने महानगरपालिकेकडून किंवा तिच्या वतीने, वेळोवेळी मिळतील अशा रकमांमधून, अशी रक्कम देण्यासंबंधी निदेश देता येईल व अशा बँकेस किंवा व्यक्तीस अशा आदेशाचे पालन करणे बंधनकारक असेल.

(३) पोट-कलम (२) खालील आदेशानुसार करण्यात आलेल्या प्रत्येक प्रदानामुळे, बँकेने किंवा व्यक्तीने अशा रीतीने अशा बँकेमध्ये किंवा त्या व्यक्तीकडे जमा केलेल्या त्या महानगरपालिकेच्या पैशांमधून अशा रीतीने देण्यात आलेल्या कोणत्याही रकमेसंबंधात, महानगरपालिकेप्रत असलेल्या दायित्वांमधून, अशा बँकेची किंवा व्यक्तीची पुरेशा रीतीने मुक्तता होईल.

## संकीर्ण

१५. आकारणी प्राधिकारी किंवा अपील प्राधिकारी किंवा यांपैकी कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी यांस, रीतसर नोटीस दिल्यानंतर, सूर्योदय आणि सूर्यास्त यामधील कोणत्याही वेळी, कोणत्याही करयोग्य जागेसंबंधातील तपशील गोळा करण्याच्या प्रयोजनासाठी, किंवा त्या जागेची मोजमापे घेण्यासाठी, त्या जागेमध्ये प्रवेश करता येईल आणि त्या जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास किंवा इतर कोणत्याही प्रभारी व्यक्तीस त्या जागेमध्ये ठेवण्यात आलेले कोणतेही पुस्तक, नोंदवही किंवा अभिलेख तपासणीसाठी सादर करण्यास भाग पाडता येईल आणि कर आकारणीच्या प्रयोजनासाठी करयोग्य जागेसंबंधातील कोणतीही माहिती विचारता येईल आणि जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास किंवा प्रभारी व्यक्तीस, मोजमापे घेण्यासाठी किंवा अशा तपासणीसाठी सोयी उपलब्ध करून देणे आणि त्याच्याजवळ उपलब्ध असेल अशी माहिती देणे बंधनकारक असेल. प्रवेश, निरीक्षण वगैरे करण्याची शक्ती.

१६. (१) कोणतीही करपात्र व्यक्ती आकारणी प्राधिकाऱ्याची अशी खात्री करून देईल की, तिने दिलेल्या कराची रक्कम, या अधिनियमान्वये जी रक्कम तिच्याकडून रीतसर आकारण्याजोगी असेल त्या रकमेपेक्षा अधिक आहे तर अशा करपात्र व्यक्तीस, आकारणी प्राधिकाऱ्याकडून अशा कोणत्याही जादा रकमेचा परतावा मिळण्याचा हक्क असेल. परतावे.

(२) आपल्या अपिलीय शक्तींचा वापर करताना अपील प्राधिकाऱ्याची तशी खात्री होईल तर तो, चुकीने भरण्यात आल्याचे किंवा जादा भरण्यात आल्याचे आढळून आलेली रक्कम आकारणी प्राधिकाऱ्यास परत करण्यास भाग पाडील.

१७. कलम १६ खालील कराचा कोणताही परतावा मिळण्यासंबंधीचा कोणताही दावा, करपात्र व्यक्तीने कर दिल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत किंवा अपील दाखल करण्यात आले असेल त्याबाबतीत, अपिलातील आदेश मिळाल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत, करण्यात आला नसेल तर, दाखल करून घेण्यात येणार नाही. परताव्यासाठी दाव्याची मुदत.

कर देण्या-संबंधातील कसुरीबद्दल शास्ती. १८. (१) कलम ११ च्या उपबंधानुसार कर वसुलीसंबंधी मागणीची नोटीस बजावण्यात आल्यानंतर, कोणतीही व्यक्ती, नोटिशीत नमूद केलेल्या मुदतीच्या आत, तिच्याकडून कराबद्दल देय असलेली कोणतीही रक्कम देण्यात कसूर करील तर, अशा व्यक्तीने हेतुपुरस्सर कर देण्यात कसूर केली आहे याबद्दल खात्री झाल्यानंतर, महानगरपालिकेस किंवा यथास्थिती जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या सामान्य किंवा विशेष आदेशांस अधीन राहून, तिच्याकडून देय असलेल्या कराच्या रकमेशिवाय, अशा रीतीने न देण्यात आलेल्या कराच्या रकमेच्या एक दशांशापेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम तिच्याकडून शास्ती म्हणून वसूल करता येईल.

(२) या कलमान्वये वसूल करण्याजोग्या रकमा, कलम ११ मध्ये कर वसुलीसाठी तरतूद केलेल्या रीतीने, वसूल करण्यात येतील.

विवरण देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती. १९. (१) कोणतीही व्यक्ती, वाजवी कारणाशिवाय किंवा सबबीशिवाय कलम ७ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले कोणतेही विवरण, आकारणी प्राधिकाऱ्याकडे देण्यात कसूर करील तर, आकारणी प्राधिकाऱ्यास, शंभर रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी शास्ती लादता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये लादण्यात आलेली शास्ती, कलम ११ च्या पोट-कलम (२) अन्वये ज्या रीतीने कर आणि शास्ती वसूल करण्यात येईल त्याच रीतीने वसूल करता येईल.

खोटी निवेदने वगैरे करण्याचा अपराध. २०. कोणतीही व्यक्ती, कलम ७ च्या पोट-कलम (३) किंवा पोट-कलम (४) अन्वये देण्यात आलेल्या विवरणात असे कोणतेही निवेदन करील किंवा कलम १५ अन्वये अशी माहिती पुरवील की, जी खोटी असेल किंवा जी एकतर खोटी असल्याचे तिला माहीत असेल किंवा खोटी असल्या-बद्दल तिचा विश्वास असेल किंवा जी खरी असल्याबद्दल तिचा विश्वास नसेल तर, त्या व्यक्तीने भारतीय दंड संहितेच्या कलम १७७ मध्ये वर्णन केलेला अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

अडथळा केल्याबद्दल शास्ती. २१. कोणतीही व्यक्ती, आकारणी किंवा अपील प्राधिकाऱ्यास किंवा त्या प्राधिकाऱ्यापैकी कोणत्याही प्राधिकाऱ्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, कलम १५ खालील आपली कर्तव्ये पार पाडण्यास अडथळा करील तर, तिला, अपराधसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कोणतीही कारावासाची किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

कंपन्यांनी केलेले अपराध. २२. (१) या अधिनियमाखालील एखादा अपराध कंपनीकडून झाला असेल त्याबाबतीत, अपराध झाला तेव्हा जी व्यक्ती कंपनीचा कारभार चालविण्यासाठी कंपनीची प्रभारी होती आणि कंपनीच्या कारभारासाठी कंपनीस जो जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती, त्याचप्रमाणे कंपनीही अशा अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि तिच्यावर खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास ती पात्र असेल :

परंतु, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, अशी व्यक्ती असे सिद्ध करील की, तिच्या नकळत असा अपराध झालेला आहे किंवा असा अपराध घडू नये म्हणून तिने सर्व वाजवी दक्षता घेतली होती तर, या अधिनियमामध्ये उपबंधित करण्यात आलेल्या कोणत्याही शिक्षेस अशी कोणतीही व्यक्ती पात्र ठरणार नाही :

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि असा अपराध, कोणताही संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्यांनी कानाडोळा केल्यामुळे किंवा त्यांच्या हयगयीमुळे झाला आहे असे सिद्ध करण्यात येईल त्याबाबतीत, असा संचालक, व्यवस्थापक, चिटणीस किंवा

१५७

इतर अधिकारी हा त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्याच्यावर खटला भरला जाण्यास आणि तदनुसार शिक्षा होण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी,

(अ) 'कंपनी' म्हणजे एखादा निगम निकाय आणि त्यामध्ये, एखाद्या भागीदारी संस्थेचा किंवा व्यक्तींच्या इतर संघटनेचा समावेश होतो ;

(ब) भागिदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " म्हणजे भागीदारी संस्थेतील भागीदार.

२३. पुढील निवासी जागांना कर प्रदानापासून सूट देण्यात येईल,— विवक्षित निवासी जागांना कराच्या प्रदानापासून सूट.

(अ) केंद्र सरकारकडे निहित असणाऱ्या जमिनी व इमारती ;

(ब) कोणत्याही शासनाकडे निहित असणाऱ्या किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या असलेल्या आणि केवळ सार्वजनिक प्रयोजनांसाठीच वापरण्यात येणाऱ्या व लाभासाठी वापरण्यात न येणाऱ्या किंवा वापरण्याचा इरादा नसलेल्या, इमारती ;

(क) मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विश्वस्तांकडे निहित असणाऱ्या आणि लाभासाठी वापरण्यात न येणाऱ्या किंवा वापरण्याचा इरादा नसलेल्या इमारती.

२४. शंका निरसनार्थ याद्वारे असे घोषित करण्यात येते की, या अधिनियमाचे उपबंध हे, स्थावर मालमत्तेवर कर बसविण्याची तरतूद करणाऱ्या इतर कोणत्याही विधीच्या उपबंधाशिवाय असतील. या अधिनियमाखालील कर इतर कराशिवाय असेल.

२५. (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याची शक्ती.

(२) या कलमाद्वारे प्रदान करण्यात आलेली नियम करण्याची शक्ती, तिचा वापर करण्याचा प्रथम प्रसंग खेरीज करून, पूर्व प्रसिद्धीनंतर नियम करण्यात येतील या शर्तीस अधीन असेल.

(३) या कलमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात, किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल ; आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यासंबंधी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये याविषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करण्यात येईल तर, अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून तो नियम केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिती, तो नियम अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे, त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे राहून गेलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाध येणार नाही.

अनुसूची

(कलम ३ पहा)

| क्षेत्र<br>१ | कराचा दर<br>२ |
|---|---|
| **एक. बृहन्मुंबई—** | |
| (अ) निवासी जागेच्या तळजमिनीचे एकूण क्षेत्र १२५ चौरस मीटरपेक्षा अधिक, परंतु १५० चौरस मीटरपेक्षा अधिक होत नसेल त्या बाबतीत. | १२५ चौरस मीटरपेक्षा अधिक होणाऱ्या दर चौरस मीटरला किंवा त्याच्या भागास रुपये २·५०. |
| (ब) निवासी जागेच्या तळजमिनीचे एकूण क्षेत्र १५० चौरस मीटरपेक्षा अधिक, परंतु २०० चौरस मीटरपेक्षा अधिक होत नसेल त्या बाबतीत. | रुपये ६२·५० अधिक, १५० चौरस मीटरपेक्षा अधिक होणाऱ्या दर चौरस मीटरला किंवा त्याच्या भागास, रु. ५·००. |
| (क) निवासी जागेच्या तळजमिनीचे एकूण क्षेत्र २०० चौरस मीटरपेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत. | रुपये ३१२·५० अधिक, २०० चौरस मीटरपेक्षा अधिक होणाऱ्या दर चौरस मीटरला किंवा त्याच्या भागास, रु. १०·००. |
| **दोन. इतर महानगरपालिका क्षेत्रांच्या हद्दीत—** | |
| (अ) निवासी जागेचे तळजमिनीचे एकूण क्षेत्र १५० चौरस मीटरपेक्षा अधिक परंतु २०० चौरस मीटरपेक्षा अधिक होत नसेल त्या बाबतीत. | १५० चौरस मीटरपेक्षा अधिक होणाऱ्या, दर चौरस मीटरला किंवा त्याच्या भागास २·५० रुपये. |
| (ब) निवासी जागेच्या तळजमिनीचे एकूण क्षेत्र २०० चौरस मीटरपेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत. | रुपये १२५ अधिक, २०० चौरस मीटरपेक्षा अधिक होणाऱ्या दर चौरस मीटरला किंवा त्याच्या भागास, रु. ५. |

(यथार्थ अनुवाद)

**वा. म. कुलकर्णी,**

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.